**नियमीत दिवाणी दावा क्रमांक. ०२/२०१५**
**विश्वजीत चेवले वि.केवलबाई व इतर**
**आदेश नि.क्रं.५५ वर**
**MHLA130005812014**

प्रस्तुतचा अर्ज वादीने आदेश ६ नियम १७ दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जावर वादीने त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले आहे. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

२. वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे कथन केले की, प्रस्तुत अर्ज दाखल करत असतांना वादी क्रं १ ते ४ चे वय चुकीने आज्ञान दाखविण्यात आलेले आहे. परंतू वादी क्रं १ ते ३ याचे आधार कार्ड नुसार वय सज्ञान झालेले आहे तरी सदर अनुषंगीक दुरुस्ती दाव्यामध्ये समाविष्ट करण्याचे राहूल गेले आहे. त्यानुषंगाने वादपत्रामध्ये आवश्यक ती दुरुस्तीकरणे गरजेचे आहे. सबब अर्ज मंजूर करावा.

३. प्रतिवादीने त्याचे प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जाकामी हरकत नोंदवली नाही. सदरील दुरुस्ती करण्यास त्याचा कसलाही आक्षेप नसल्याचे सांगितले आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, दावा दाखल करीत असताना दाव्यात वादीकडुन काही गोष्टीचे विस्मरण झालेले आहे. प्रस्तुत दाव्याचा निकाल गुणदोषावर होणेकरीता दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रस्तावीत दुरुस्तीस परवानगी दिल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देणे न्यायोचित ठरेल. सबब खालीलप्रमाणे आदेश.

## आदेश

१. वादी यांचा अर्ज नि.क्रं ५५ मंजुर करण्यात येतो.
२. वादीने प्रतिवादीस रु.२००/– खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येतो.
३. वादीने प्रस्तावीत दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करुन दुरुस्ती वादपत्र प्रतिवादींना पुरविण्यात यावी.

SD/–
**(के.के.वाघमारे)**
**सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर.,**
**रेणापूर**

**रेणापूर**
**दिनांकः– २०/०१/२०२४**